# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. : २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

आरक्षण कक्ष
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेल: arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्र. आरक्षण/ओ-२२/ 745

दिनांक : 30-5-14

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषयः- बिंदुनामावली (रोस्टर) तपासणीत तसेच भरती व पदोन्नतीवेळी अनियमितता होणार नाही याची खात्री करणेबाबत.

संदर्भः- मा.विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, मागासवर्ग कक्ष, पुणे विभाग यांचे संदर्भ पत्र क्रमांक- मावक/वशी-/३४४/ २०१४, दिनांक- ०६.०५.२०१४.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मा. विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, मागासवर्ग कक्ष, विधानभवन, पुणे विभाग, पुणे यांच्या संदर्भीय पत्राची प्रत सोबत जोडली आहे. सदर पत्रात निर्देश दिल्याप्रमाणे पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये / संस्था यांनी प्रत्येक भरती व बढती (पदोन्नती) पुर्वी बिंदुनामावलीची (रोस्टर) प्राथमिक तपासणी आरक्षण कक्ष, पुणे विद्यापीठ व अंतिम तपासणी पुणे जिल्हयामधील महाविद्यालयांनी मा. सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, आयुक्त कार्यालय, विधानभवन, पुणे विभाग, पुणे तसेच अहमदनगर व नाशिक जिल्हयामधील महाविद्यालयांनी मा. सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, नाशिक यांचेकडुन करून घेण्यात यावी. बिंदुनामावलीची अंतिम तपासणी करून घेतल्याशिवाय भरती व बढतीची (पदोन्नती) प्रक्रीया करू नये. त्याचप्रमाणे अंतिम तपासणीनुसार आरक्षण, अनुशेष, पात्रता व इतर सर्व नियमांचा जबाबदारपणे अभ्यास करून सरळ सेवा प्रवेश (भरती) व विभागीय पदोन्नतीबाबत (बढती) नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आपला,

(डॉ.नरेंद्र मा.कडु)
कुलसचिव

सोबतः- मा.विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, मागासवर्ग कक्ष, पुणे विभाग यांचे संदर्भ पत्र क्रमांक- मावक/वशी-/३४४/ २०१४, दिनांक- ०६.०५.२०१४.

आरक्षण कक्ष
पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७
दिनांक - 16-5-14 आवक क्र. - 918
विभाग -



# आयुक्त कार्यालय, विधानभवन, पुणे विभाग, पुणे १

## शाखा- मागासवर्ग कक्ष (दूरध्वनी : २६३६१०३२)

क्र.मावक/वशी-/ ३७६ /२०१४. दिनांक: ६ /५/२०१४.

प्रति,

१) कुलसचिव, विद्यापीठ पुणे / सोलापूर / कोल्हापूर
२) शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
३) शिक्षणाधिकारी पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर,

कुलसचिव कार्यालय
पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक क्र. आर/ 1388
दिनांक - 13/5/14
जावक दिनांक - 15/5/14

विषय :- आपले अधिनस्त शैक्षणिक संस्थांच्या रोस्टर तपासणीत तसेच भरती व पदोन्नतीवेळी अनियमितता होणार नाही याची खात्री करणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविणेत येते की, शालेय शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बिंदू नामावल्या शिक्षणाधिकारी / शिक्षण उपसंचालक यांचेकडून तपासून देणेत येतात. त्यानंतर सदर बिंदू नामावल्या या कार्यालयाकडून प्रमाणित करण्यात येतात. सदरचे कामकाज करीत असताना असे निदर्शनास आले आहे की, शैक्षणिक संस्थांना आपले कार्यालयातून पदे मंजूरीची संचमान्यता दिली जाते. तथापि आपले कार्यालयाकडून शैक्षणिक संस्थांना वैयक्तिक मान्यता देतेवेळी संचमान्यतेनुसार मंजूर पदसंख्येस असणारे आरक्षण विचारात घेतले जात नाही. त्याचप्रमाणे पदोन्नती देतेवेळी मंजूर पदसंख्येनुसार असलेले आरक्षण व अनुशेष तसेच सेवाजेष्ठता विचारात घेवून दिली जात नाही. विजाभज अंतर्गत भरती करताना अंतर्गत परिवर्तनाचे मान्यता आदेश दिले जात नाहीत. त्याचप्रमाणे या कार्यालयाकडून रोस्टर तपासणी करुन न घेता आपले कार्यालयातून सरळसेवा व पदोन्नतीबाबत कर्मचा-यांचे मान्यता आदेश दिले जातात. त्यामुळे या कार्यालयामध्ये संस्थांच्या विरुध्द अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत ही बाब प्रशासकीयदृष्टया योग्य नाही.

आरक्षण कायदा २००४ मधील कलम ११ मधील तरतुदीनुसार या अधिनियमातील तरतुदीचे उल्लंघन करुन केलेल्या कोणत्याही नियुक्त्या निरर्थक ठरतात तसेच कलम ८ मधील तरतुदीनुसार आरक्षण कायदयातील तरतुदींचा हेतूपुरस्सर रितीने भंग होईल अशी कृती करणा-या अधिका-याला ९० दिवसाच्या कारावासाची किंवा रु. ५०००/- दंडाची अथवा दोन्ही अशा शिक्षेची तरतुद करणेत आली आहे. यास्तव आपणास सूचना करणेत येते की, आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शैक्षणिक संस्थांना वेळोवेळी निर्गमीत झालेले शासन निर्णय तसेच आरक्षण कायदयातील महत्वाच्या तरतुदी निदर्शनास आणून दयाव्यात. प्रत्येक संस्थेने बिंदू नामावली बरोबर ठेवली आहे की नाही तसेच बिंदू नामावलीच्या क्रमानुसार आरक्षणाची पदे भरली आहेत किंवा कसे याची पडताळणी करणेत यावी.

- उ.कु.प्र. शिक्षकेतर कक्ष
- उ.कु. आरक्षण कक्ष
- सहा. कुलसचिव शिक्षक कक्ष

12.5.2014

आपले अधिनस्त शैक्षणिक संस्थांच्या बाबतीत भरती किंवा बढतीबाबत आरक्षण अनुशेषानुसार कार्यवाही करणेत यावी. प्रत्येक भरती व बढती पूर्वी या कार्यालयाकडून रोस्टर तपासणी करुन त्यामध्ये असलेल्या अनुशेषाप्रमाणे मान्यता घेतलेशिवाय भरती व बढतीची प्रक्रिया करणेत येवू नये. त्याचप्रमाणे आरक्षण अनुशेषाचा व पात्रतेचा, नियमांचा जबाबदारपणे अभ्यास करुन पदोन्नतीबाबत आदेश निर्गमित करणेत यावेत. शैक्षणिक संस्थांचे नियुक्ती व नियंत्रण अधिकारी या नात्याने आपण शैक्षणिक संस्थांनी दिलेल्या सर्व पदोन्नत्या व भविष्यात दिल्या जाणा-या पदोन्नतींबाबत गांभीर्याने लक्ष देणेबाबतच्या सूचना मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांनी दिल्या आहेत.

तरी मा. विभागीय आयुक्त यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे शैक्षणिक संस्थांनी भरती व पदोन्नती बाबत केलेल्या कार्यवाहीबाबत तपासणी करुन नियमानुसार कार्यवाही होत असल्याची खात्री करणेत यावी

मा.विभागीय आयुक्त यांचे मान्यतेने

**विभागीय आयुक्त**
**पुणे विभाग, पुणे करीता**